admn18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER
कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

संकेतस्थळ : www.mcaer.org
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/२०१७/१६९
दि.१८ जानेवारी,२०१८

प्रति,

कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी)
महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, जि.अहमदनगर
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी
डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

**विषयः- कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता सामायिक प्रवेश परीक्षेच्या अनिवार्यतेबाबत प्रसिध्दी देणेबाबत.**

महोदय,

कृषी विद्यापीठांतर्गत सात पदवी अभ्यासक्रमांना व्यावसायिक म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. यामुळे महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम,२०१५ मधील तरतुदीनुसार विना अनुदानित खाजगी संस्थांच्या महाविद्यालयामध्ये पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी सामायिक प्रवेश परीक्षा अनिवार्य ठरते. सदरची सामायिक प्रवेश परीक्षा, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून राबविण्यात येते. याचबरोबर कृषी विद्यापीठांतर्गत सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशास सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून सामायिक प्रवेश परीक्षा अनिवार्य करण्याबाबतचा कृषी परिषदेने निर्णय घेतला आहे.

यास अनुसरुन राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील सामायिक प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक प्रसिध्द केले आहे. सदरची प्रक्रिया दि.१८/१/२०१८ पासून सुरु झालेली असून यासाठीची माहिती पुस्तिका व ऑनलाईन अर्ज राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या www.dtemaharashtra.gov.in/mhtcet2018 या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर वे संकेतस्थळ कृषी परिषदेच्या संकेतस्थळाशी जोडण्यात आलेले आहे व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावरसुध्दा माहिती पुस्तिका उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याचप्रमाणे हे संकेतस्थळ कृषी विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळाशी जोडावे, जेणेकरून प्रवेशोच्छुकांना माहिती पुस्तिका व ऑनलाईन अर्ज दाखल करणे सुलभ होईल.

यास्तव आपणास कळविण्यात येते की, **कृषी विद्यापीठांतर्गत कृषी, उद्यानविद्या, वनशास्त्र, गृहविज्ञान, कृषी अभियांत्रिकी, अन्नतंत्र, कृषी जैवतंत्रज्ञान, मत्स्यविज्ञान, पशुसंवर्धन आणि व्यवसाय व्यवस्थापन हया दहा पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य**

Registrar Office
In ward No...../...
Date...../.../...

Rej.

admn18-19

**सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने आयोजित केलेली MHT-CET ही सामायिक प्रवेश परीक्षा अनिवार्य करण्यात येत आहे किंवा JEE / NEET / AIEEA-UG (भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणारी- All India Entrance Examination Test for Admission) यापैकी कोणतीही सामायिक प्रवेश परीक्षा ग्राह्य धरण्यात येईल, असे प्रसिध्द करावे.**

सामायिक प्रवेश परीक्षेमध्ये (MHT-CET / JEE / NEET / AIEEA-UG) प्राप्त झालेल्या गुणांच्या **७० टक्के गुण** आणि पात्रता परीक्षेमध्ये (इ. १२ वी (विज्ञान) परीक्षेमध्ये) प्राप्त झालेल्या एकूण गुणांच्या **३० टक्के गुण** तसेच कृषी परिषदेच्या सद्यस्थितीतील तरतुदी / नियमानुसार **इतर अधिभार** यांच्या आधारावर उमेदवाराची गुणवत्ता निश्चित करण्यात येईल. इतर नियम व कार्यपध्दती प्रचलित पध्दतीप्रमाणे असेल, असेही नमूद करण्यात यावे.

कृषी विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षा लागू करण्याचे हे प्रथमच वर्ष असल्याने याकाठी विद्यार्थी व पालकांमध्ये जागरुकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. यास्तव आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय / विना अनुदानित पदवी महाविद्यालये यांना त्यांच्यास्तरावर जाहिराती प्रसिध्द करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

याचबरोबर (१) कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रांतर्गत जिल्हयांमधील कनिष्ठ महाविद्यालयांमध्येसुध्दा प्रसिध्दी देणेबाबत कृषी विद्यापीठांनी कार्यवाही करावी. (२) कृषी विद्यापीठे, सर्व शासकीय, अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेशोच्छुक उमेदवारांना मार्गदर्शन करण्यासाठी माहिती व सल्ला केंद्रे सुरु करण्यात यावीत. (३) स्थानिक वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादी माध्यमांद्वारे अधिकाधिक प्रसिध्दी देण्यात यावी. (४) सामायिक प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी प्रवेशोच्छुकांना मदत करण्याच्या सूचना सर्व महाविद्यालयांना देण्यात याव्यात, ही नम्र विनंती.

कृषी विद्यापीठातील सर्व पदवी अभ्यासक्रमांना सामायिक प्रवेश परीक्षा-२०१८ आवश्यक असल्याबाबत सर्वस्तरावर प्रसिध्द देणेकरिता सविनय सादर. तसेच केलेल्या कार्यवाहीबद्दल अनुपालन अहवाल कृषी परिषदे सादर करण्यात यावा, ही विनंती.

**मा. महासंचालक**
**यांच्या मान्यतेने.**

(स्वाक्षरी)
**संचालक (शिक्षण)**

प्रत:-

मा. कुलगुरु यांचे स्वीय सहायक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

यांना मा. कुलगुरु यांना अवगत करणेयास्तव...